## प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/ ७३३० /२०१९

पुणे शहर, दिनांक – ०८/०९/२०१९

**विषय :- मोहरम - २०१९ मिरवणूक मार्ग वाहतूक व्यवस्थे बाबत.**

-----------

पुणे शहरात मंगळवार, दिनांक- १०/०९/२०१९ रोजी, मोहरम सणानिमीत्त खालील नमूद मार्गांवरुन ताबूत, पंजे, छबिले यांचे विसर्जन करणेकरीता मिरवणूका निघणार आहेत. सदर मिरवणूकी दरम्यान वाहतुकीची कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे वाहतुक बंद/वळविणे बाबतचे आदेश निर्गमित करीत आहे.

**१. मुख्य मिरवणूक मार्ग, दुपारी १४.०० वा.**

**मार्ग** :- पॉवर हाऊस चौक,- नेहरुरडोड सरळ नरपतगिरी चौक- मालधक्का चौक- डावीकडे वळून आंबेडकररोडने शाहीर अमर शेख चौक- डावीकडे वळून कुंभारवेस चौक- परत वळून मागे शाहिर अमर शेख चौक- रेल्वे पुलाखालुन- आर.टी.ओ. चौक डावीकडे वळून संगमघाट विसर्जन ठिकाण.

**२. लष्कर मिरवणूक मार्ग, दुपारी १२.०० वा.**

**मार्ग** :- ६९४ ताबुत स्ट्रीट, बाटलीवाला बगीचा, दस्तुर मेहेर रोड, सरबतवाला चौक, बाबाजान दर्गा, भोपळे चौक, गावकसाब मशिद डावीकडे वळून एम.जी. रोडने कोहीनुर चौक, भगवान महावीर चौक, नाझ हॉटेल चौक, डावीकडे वळून बुटी स्ट्रीटने बाटलीवाला बगीचा चौक या ठिकाणी १४-०० वा. चे सुमारास येऊन धार्मिक कार्यक्रमासाठी थांबतात. त्यानंतर पुढे नेहरू मेमोरीयल हॉल - रहीम पेट्रोल पंप- जुना समर्थ पोलीस स्टेशन मार्गे डावीकडे वळून पॉवर हाऊस चौकातून उजवीकडे वळून नरपतगीर चौक - मालधक्का चौक- डावीकडे वळून शाहीर अमर शेख चौक डावीकडे वळून कुंभार वेस चौक यु टर्न करुन पुन्हा शाहीर अमर शेख चौक आरटीओ चौक- संगमब्रीज येथे विसर्जन.

**३. खडकी भागातून निघणारी मिरवणूक मार्ग, दुपारी १६.०० वा.**

**मार्ग** :- आसुडखाना चौक, नवीन तालिम चौक, स्टार हॉटेल चौक, महाराष्ट्र बॅक चौक, डी आर गांधी चौक, टिकाराम चौक, सराफ बाजार मार्गे, खडकी रेल्वे स्टेशन, मुंबई-पुणे रोडने बोपोडी, वि.भा.पाटील पुलावरुन नदीत विसर्जन.

**४. इमामवाडा येथून निघणारी मिरवणूक मार्ग, सकाळी १०.३० वा.**

**मार्ग** :- इमामवाडा लष्कर ते आगाखान कंपाऊंड ते परत इमामवाडा मार्ग- रहिम पेट्रोलपंप, नेहरु मेमोरीयल चौक, डावीकडे वळून पोलीस आयुक्त कार्यालय समोरुन जनरल पोस्ट ऑफिस चौक, साधु वासवानी चौक, १३ कॅनॉट रोड, आगाखान कंपाऊंड येथे धार्मिक कार्यक्रम होऊन परत उलट मार्गाने इमामवाडा येथे विसर्जन.

वरील नमूद मिरवणूक मार्गावरील वाहतूक **आवश्यकतेनुसार** अल्पकालावधी करीता बंद अथवा वळविण्यात येणार आहे तसेच मिरवणूक पुढे सरकताच पाठीमागील वाहतूक पुर्ववत करण्यात येईल. तरी वाहन चालकांनी वरील नमूद मार्गावर येण्याचे टाळावे तसेच पर्यायी मार्गाचा वापर करून वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

08.09.19

**(पंकज देशमुख)**
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक
पुणे शहर.

**प्रत** :- १. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी

S.R.Shitole
PI Khadala
+planning

Scanned by CamScanner